# छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका

दुरध्वनी क्र.२३३३५३६-४०, २३४८००१-०५

E-mail contact@chhsambhajinagarmc.org,
est1@chhsambhajinagarmc.org


संदर्भ — १) जाहिरात जा.क्र.मनपा/आस्था-१/२०२६/४२९. दि.२५/०३/२०२६.
२) कार्यालयीन आदेश जा.क्र.मनपा/साप्र(आस्था-१)/२०२६/३०३. दि.०१/०४/२०२६.

जा.क्र.मनपा/आस्था-१/२०२६/१२९३. दिनांक :- २८/०७/२०२६.

## - आदेश -

संदर्भ क्र.१ च्या जाहिरातीनुसार छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेसाठी वाहतूक अभियंता (Transport Engineer) या पदासाठी कंत्राटी/मानधन तत्वावर पात्र उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात आलेले होते. त्यानुषंगाने प्राप्त झालेल्या अर्जावर संदर्भ क्र.२ च्या आदेशान्वये गठीत केलेल्या समितीने दिलेल्या निर्णयानुसार **"वाहतूक अभियंता (Transport Engineer)"** या पदासाठी निव्वळ कंत्राटी/मानधन तत्वावर **श्री.आशुतोष साळूंके** यांची खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून नियुक्ती करण्यात येत आहे.

**अटी व शर्ती :-**

१. सदरची नियुक्ती ही ११ महिन्यांच्या कालावधीसाठी राहील.
२. संबंधितास महानगरपालिकेच्या कोणत्याही संवर्गात समावेशनाचे/सामावून घेण्याचे वा नियमित सेवेचे इतर कोणतेही लाभ मिळणार नाहीत.
३. सदर कामासाठी मानधन रु.६०,०००/- प्रतिमाह देण्यात येईल.
४. संबंधितास नियुक्तीच्या कालावधीत त्यांच्यावर सोपविलेली कामे पार पाडण्यात व्यत्यय निर्माण होईल,अशा कोणत्याही व्यावसायिक कामात गुंतता येणार नाही.
५. संबंधितास कोणत्याही प्रकारचे प्रशासकीय व वित्तीय अधिकार राहणार नाही.
६. संबंधित वाहतूक अभियंता हे कार्यकारी अभियंता (रस्ते/यांत्रिकी) यांच्या नियंत्रणाखाली काम करतील.
७. आपत्कालीन काळात रात्री-अपरात्री गरजेनुसार हजर राहून सर्व कामे करावी लागतील.
८. संबंधितास सोपविलेले कामकाज निश्चित केलेल्या कालावधीत त्यांनी पूर्ण करणे आवश्यक राहील.
९. सदर नियुक्ती ही विवक्षित कामासाठी करण्यात येत असली तरी त्या कोणत्याही विशेष परिस्थितीत कोणत्याही वेळी आगावू सूचना न देता त्या समाप्त करता येवू शकतील. त्यासाठी कारणे देणे बंधनकारक राहणार नाही.

..२..

# छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका

दुरध्वनी क्र.२३३३५३६-४०, २३४८००१-०५

E-mail contact@chhsambhajinagarmc.org,
est1@chhsambhajinagarmc.org




१०. संबंधितास प्राप्त होणाऱ्या कागदपत्रांबाबत/माहितीबाबत व आधार सामुग्रीबाबत गोपनीयता पाळणे बंधनकारक राहील.

११. सदर जबाबदारीतून मुक्त व्हावयाचे असल्यास किमान १५ दिवस अगोदर निम्नस्वाक्षरीत अधिकाऱ्याकडे लेखी अर्ज सादर करणे बंधनकारक राहील.

१२. उक्त अटी मान्य असल्याबाबत रु.५००/- मुद्रांकावर नोटरी करुन सादर करावे लागेल.

Digitally signed by
Amol Jagannath Yedage
Date: 26-07-2026
21:18:17

(अमोल येडगे)
आयुक्त
छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका

प्रति,

श्री.आशुतोष साळूंके
घर नं.८२६, सह्याद्रीनगर,
एन-५ पाण्याच्या टाकीसमोर
एन-५, सिडको,छत्रपती संभाजीनगर
भ्रमणध्वनी क्र.९५४५८८२२९९/९५११५५४४४४
ईमेल – ashutoshsalunke2529@gmail.com

प्रत :-
१) शहर अभियंता विभाग
२) कार्यकारी अभियंता (रस्ते) / (यांत्रिकी)
२) लेखा परीक्षण विभाग
३) लेखा विभाग
४) आदेश संचिका